Trust Registration Number F-3967 Bombay

**Maharashtra Judo Association**

Affiliated to Judo Federation of India and Maharashtra Olympic Association

**महाराष्ट्र ज्युदो असोसिएशन**

संलग्न: ज्युदो फेडरेशन ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन

**Datta Aphale**
**General Secretary**
Flat No. 401, Wing 'O',
Balwantpuram Samrajya,
Pethkar Projects, Shivtirth Nagar,
Paud Road, Kothrud, Pune 411 038
Cell- 94231 50231; 90499 98765
gs.mahajudo@gmail.com

25.10.2019, पुणे

मा. अध्यक्ष / सचिव,
संलग्न आणि निमंत्रित जिल्हा ज्युदो संघटना

सर्व खेळाडू, प्रशिक्षक, पालक, पंच आणि महाज्युदो परिवारातील प्रत्येकाला महाराष्ट्र ज्युदो संघटनेतर्फे शुभ दीपावली!

विषय: 47 व्या ज्युनियर्स (मुले व मुली) राज्य ज्युदो स्पर्धा आणि राष्ट्रीय निवड चांचणी स्पर्धा,नंदुरबार-2019

महोदय / महोदया,

कळविण्यास आनंद होतो की महाराष्ट्र ज्युदो संघटना आणि नंदुरबार डिस्ट्रिक्ट ज्युदो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने 47 व्या ज्युनियर्स (मुले आणि मुली) खुली राज्य ज्युदो स्पर्धा आणि राष्ट्रीय निवड चांचणी स्पर्धा-2019 नंदुरबार येथे आयोजित करण्यात आलेल्या आहेत. या स्पर्धांच्या राष्ट्रीय स्पर्धा लखनौ येथे 1 ते 5 डिसेंबर 2019 दरम्यान ज्युदो फेडरेशन ऑफ इंडियाने आयोजिल्या आहेत. 47 व्या राज्य स्पर्धेचा तपशील खालील प्रमाणे;

- स्पर्धेचा कालावधी: दिनांक 9-10 आणि 11 नोव्हेंबर 2019 (बुधवार, गुरुवार आणि शुक्रवार)
- स्पर्धेचे ठिकाण: एस. ए. मिशन इंग्लिश मिडियम स्कूल, तळोदा रोड, नंदुरबार.
- स्पर्धेचे वेळापत्रक:

1) दिनांक 09.11.2019;

अ) खेळाडुंचे आगमन: दुपारी 12 वाजेपर्यंत.
ब) रजिस्ट्रेशन: सकाळी 7 ते 12 पर्यंत;
क) वजने: सकाळी 8 ते 3 वाजेपर्यंत;
ड) व्यवस्थापक आणि पंचांची मीटिंग दुपारी 3 वाजता;
इ) स्पर्धा: संध्या. 5 वाजेपासून ते वेळापत्रक संपेपर्यंत;

2) दिनांक दि.10 आणि 11 नोव्हनेबर 2019; स्पर्धा - सकाळी 8.00 ते वेळापत्रक संपेपर्यंत.

सर्व सचिवांना विनंती आहे की वेळेचे आणि पुढील स्पर्धांचे वेळापत्रक लक्षात घेता आपल्या संघाच्या प्रवासाचे नियोजन तसे आखून वेळेवर संघाला स्पर्धास्थानी वेळेवर उपस्थित रहाण्याच्या सूचना द्याव्यात.

निवास व्यवस्था: मुली- एस ए मिशन मुलींचे वसतिगृह ; मुले- स्पर्धा ठिकाणी

एंट्री फॉर्म: यावर्षीच्या सर्व स्पर्धांपासून आपण सर्व एंट्री (प्रवेशिका) ऑनलाइन पद्धतीने स्वीकारणार असल्याचे ठरवले आहे आणि त्याप्रमाणे जळगाव येथील राज्य स्पर्धांपासून त्याचा यशस्वी प्रारंभ झाला आहे.

ऑनलाइन एंट्री (प्रवेशिका) भरण्यासाठी आपण आपल्या खेळाडूंची यादी सर्वात आधी खेळाडूंच्या तपशील आणि प्रत्येकाचा पासपोर्ट आकाराचा फोटो आधी तयार ठेवावा. एंट्री भरण्याआधी सर्वांनी खालील महत्वाचे मुद्दे लक्षात घ्यावेत आणि मगच फॉर्म ऑनलाइन सबमिट कण्यास सुरुवात करावी.

1. प्रवेशिकाच्या यादीमध्ये खेळाडूंची पूर्ण नावे, जन्मतारीख, पत्ता (जिल्ह्याचे नाव) आधार कार्ड नंबर आदी माहिती भरावयाची आहे. यासाठी ऑनलाइन यादी भरण्याआधी आपण खेळाडूंच्या नावांचे स्पेलिंगसह ही सर्व माहिती सुनिश्चित करावी.
2. www.mahajudo.com या आपल्या वेबसाइटवर जावे.
3. तेथे अपलोड Entry Form या ठिकाणी क्लिक करावे
4. यानंतर सर्व जिल्हयांची यादीचे पेज येईल. त्यातील आपल्या जिल्ह्याच्या नावावर आपण क्लिक करावे.

5. येणाऱ्या बॉक्समध्ये आपल्याला दिलेला पासवर्ड टाकावा.
6. पासवर्ड टाकल्यावर एंट्री फॉर्म आपल्यासमोर येईल, तो फॉर्म प्रथम नीट वाचावा.
7. या फॉर्ममध्ये आपल्या जिल्ह्याचे नाव, खेळाडूंचा वयोगट टाईप केल्यावर मुले आणि मुली खेळाडूंच्या नावाची यादी भरण्यासाठी सुरुवात करावी.
8. पूर्ण नाव आणि वजनगट भरल्यानंतर प्रत्येक खेळाडूचे आपण जन्मतारखेचे निर्धारित दाखले, आधार कार्ड आणि खेळाडूचा फोटो अपलोड करायचा आहे.
9. ऑनलाइन फॉर्ममध्ये यादी पूर्ण रूपाने व्यवस्थित असल्याची खात्री करावी आणि ती झाल्यानंतरच सबमीट बटण क्लिक करावे.
10. आपण पाठविलेल्या खेळाडूच्या माहितीच्या आधारे आपण खेळाडूंची स्पर्धा-प्रमाणपत्रे आणि नोंदणी ओळखपत्रे तयार करून देणार आहोत. ज्या खेळाडूंना ओळखपत्रे दिली जातील त्या खेळाडूंना यापुढे तीन वर्षांपर्यंत आयोजित होणाऱ्या राज्यस्पर्धेसाठी जन्मतारखेचे दाखले पुन्हा एमजेएला सादर करण्याची गरज नाही.

जिल्ह्याने एंट्रीद्वारे पाठविलेल्या खेळाडूंची नावे पुढील कार्यवाहीसाठी म्हणजे ओळखपत्र, लॉटससाठी वापरली जाऊन त्याच नावांची खेळाडूंची यादी ओळखपत्रे आणि प्रमाणपत्रे कम्प्युटरच्या माध्यमातून प्रिंट करण्यासाठी वापरली जाईल.
यासाठी सर्वांना पुन्हा एकदा सूचना की, खेळाडूंच्या माहितीच्या विवरणामध्ये योग्य स्पेलिंगसह पूर्ण नाव, जन्मतारीख इत्यादी, जिल्हा सचिवांनी अत्यंत काळजीपूर्वक भरावी. यदाकदाचित जर नावांमधील काही चुका झाल्यास आणि त्याप्रमाणे आयडी-कार्ड आणि सर्टिफिकीट प्रिंट झाल्यास परत ओळखपत्रे किंवा प्रमाणपत्रे तयार केले जाणार नाहीत आणि या नुकसानीस जिल्हा संघटना सर्वस्वी जबाबदार असेल.
एंट्री फॉर्मवर अध्यक्ष अथवा सचिव यांनी स्वाक्षरी करून हा फॉर्म अधिकृत संघ व्यवस्थापकांबरोबर स्पर्धेठिकाणी जन्मतारखेच्या दाखल्यांसह द्यावा.

- एंट्रीबरोबर प्रत्येक खेळाडूचे जन्मतारखेचे मूळ (ओरिजिनल) दाखले आणि त्यांच्या झेरॉक्स-प्रती जमा करावयात तसेच एक पासपोर्ट आकाराचा फोटो जमा करावा.
- मूळ कागदपत्रे पाहिल्यावर झेरॉक्स दाखले प्रमाणित करून MJA रेकॉर्डसाठी ठेवले जातील आणि मूळ कागदपत्रे जिल्हा संघ व्यवस्थापकांकडे लगेचच दिली जातील.
- त्यामुळे संघ व्यवस्थापकांनी झेरॉक्स दाखले सत्यापित झाल्यावर मूळ दाखले आठवणीने न्यावेत. ही जबाबदारी संघ व्यवस्थापकांची असेल. ते संघ व्यवस्थापकांनी मूळ दाखले परत न नेल्यास / गहाळ झाल्यास राज्य ज्युदो संघटनेचे कोणतेही पदाधिकारी, आयोजक संघटनेचे पदाधिकारी अथवा स्पर्धेसाठी नेमलेले कोणतेही तांत्रिक अधिकारी जबाबदार असणार नाहीत याची नोंद घ्यावी आणि संघ व्यवस्थापकांना काम झाल्यावर दाखले परत घेण्याच्या सूचना जिल्हा सचिवांनी गांभिर्याने द्याव्यात.

- ➢ पाठवलेल्या एंट्रीमध्ये आपण दिनांक 07.11.2019 रोजीच्या रात्रो 11.59 पर्यन्त बदल करू शकता, मात्र त्यानंतर केले बदल हे उशीराची एंट्री समजली जाईल.
- ➢ दिनांक 07.11.2019 रोजी रात्रो 11.59 नंतर एंट्री स्वीकारणे सिस्टिम बंद करेल.
- ➢ प्रवेशिकांमधे दिल्या गेलेल्या वजनगटामध्येच खेळाडूला खेळावे लागेल.
- प्रवेश शुल्क: रुपये 300/- प्रत्येकी. निमंत्रित संघ वार्षिक शुल्क रुपये 3,000/- ज्यांनी जळगांव येथे भरले नसतील त्यांना या स्पर्धेवेळी भरावे लागतील याची नोंद घ्यावी.
- भोजन शुल्क: रुपये 500/- यामध्ये दि.09-10 आणि 11 नोव्हेंबर 2019 रोजी एकूण 2 न्याहारी, 5 भोजन सामील आहे.
- निवास व्यवस्था: दिनांक 09.11.2019 च्या दुपारी 12.30 पासून ते 11.11.2019 रोजीच्या संध्याकाळपर्यंत केलेली आहे.
- अनामत रक्कम: प्रत्येक संघास रु 1000/- अनामत रक्कम जमा करावे लागतील.
- रिपोर्टिंग: सर्व संघांनी स्पर्धास्थळी दिनांक 09.11.2019 रोजी दुपारी 12.00 पर्यन्त पोहोचणे आवश्यक आहे.
- पंचांनी दि. 09.11.2019 रोजी सकाळी 10 वाजेपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे.
- स्पर्धा नियम: स्पर्धा जेएफआयच्या नूतन प्रचलित नियमांप्रमाणे आयोजिल्या जातील.
- प्रत्येक जिल्ह्याच्या संघामधील मुले-मुली गटाच्या एका वजनगटामद्धे एकाच खेळाडूस सहभागी होता येईल.

- वजनगट:

| |
|---|
| मुले आणि मुली वर्ष 1999-2004 मध्ये जन्मलेले. 15 वर्षे पूर्ण आणि 21 वर्षाखालील. |
| 18 वर्षाखालील खेळाडूंच्या पालकांकडून हमीपत्र जिल्हा संघटनांनी घ्यावे. याचा नमूना या परिपत्रकासोबत दिला आहे. याशिवाय 18 वर्षाखालील खेळाडूंना जिल्हा चाचणी स्पर्धेत खेळू देवू नये. |

| मुले | | मुली |
|---|---|---|
| 55 किलो: 55 किलो आणि पर्यन्त | | 44 किलो: 44 किलो आणि पर्यन्त |
| -60 किलो: 55 किलोवर आणि 60 किलो पर्यन्त | | -48 किलो: 44 किलोवर आणि 48 किलो पर्यन्त |
| -66 किलो : 60 किलोवर आणि 66 किलो पर्यन्त | | -52 किलो: 48 किलोवर आणि 52 किलो पर्यन्त |
| -73 किलो: 66 किलोवर आणि 73 पर्यन्त | | -57 किलो: 52 किलोवर आणि 57 पर्यन्त |
| -81 किलो: 73 किलोवर आणि 81 पर्यन्त | | -63 किलो: 57 किलोवर आणि 63 पर्यन्त |
| -90 किलो: 81 किलोवर आणि 90 पर्यन्त | | -70 किलो: 63 किलोवर आणि 70 पर्यन्त |
| -100 किलो: 90 किलोवर आणि 100 किलो पर्यन्त | | -78 किलो: 70 किलोवर आणि 78 किलो पर्यन्त |
| +100 किलोवर | | +78 किलोवर |

- खेळाडू त्यांच्या संबंधित वजनगटामध्येच खेळू शकतील. जन्मतारखेच्या दाखल्यासंदर्भात जेएफआयच्या नियमाप्रमाणे खालील तीन मूळ अधिकृत प्रतिमधे वयाचा दाखला आणणे गरजेचे आहे. याशिवाय खेळाडूला खेळण्यास परवानगी मिळणार नाही.
- अ) महानगरपालिका / पंचायत समिती अथवा समरूप शासकीय अधिकृत व्यक्तिद्वारा जारी वयाचा दाखला / विभागातील सक्षम मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी लेटरहेडवर सहीशिक्यांनीशी जारी केलेला दाखला,
- ब) मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी लेटरहेडवर सहीशिक्यांनीशी जारी केलेले प्रमाणपत्र यामधे जन्मतारीख, वडिलांचे नाव, विद्यार्थ्याचा शिकत असलेला वर्ग, पत्ता, टेलिफोन क्रमांक, आणि शाळेचा फॅक्स आणि दूरध्वनी क्रमांक लिहिलेला असायला हवा. ही माहिती विद्यार्थ्याच्या पासपोर्ट आकाराच्या फोटोवर रबरी शिक्का आणि मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्या स्वाक्षरीसह साक्षांकीत (अटेस्टेड) केलेले हवे.
- क) भारत सरकारतर्फे जारी केलेल्या आधार कार्डाची मूळ प्रत

हे तीनही दाखले अनिवार्य असून याशिवाय खेळाडूस खेळू दिले जाणार नाही.
(दाखल्याच्या प्रमाणासाठी जेएफआयचे स्पर्धेसंदर्भातील मूळ इंग्रजी परिपत्रक ग्राह्य धरले जाईल. खेळाडुंचे वय हे कॅलेंडर वर्षाप्रमाणे जानेवारी ते डिसेंबर असे गृहीत धरले जाईल.)
आपल्या संघातील दहावी / बारावीच्या विद्यार्थ्यांची नावे प्रवेशिकेशिवाय वेगळी देणे आवश्यक आहे. या परिपत्रकासोबतच्या नमूना फॉर्ममध्ये ती द्यावीत.
10) वय सत्यापन चांचणी (Age verification Test -AVT)
मागील वर्षीपासून फेडरेशनने वयाच्या सत्यापनाविषयी चाचणी करण्याची प्रक्रिया अनिवार्य केलेली आहे. या चाचणीशिवाय राष्ट्रीय स्पर्धेमध्ये खेळू दिले जाणार नाही. आपण जरी राज्यस्पर्धेसाठी ही चाचणी अनिवार्य करणार नसलो तरी राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवडल्या गेलेल्या खेळाडूंनी मात्र ही चाचणी करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे, राज्याच्या संघामध्ये जे खेळाडू निवडले जातील त्या खेळाडूंनी जळगांव येथील स्पर्धा संपल्यावर लगेचच ही चाचणी त्यांच्या गावी करावी अन्यथा त्यांना राष्ट्रीय स्पर्धेमध्ये खेळू दिले जाणार नाही. शक्यतो ही चाचणी शासकीय दवाखान्यात करावी. जर तशी सोय आपल्याकडे उपलब्ध नसेल तरच ती इतर ठिकाणी करावी. याचे कारण म्हणजे गतवर्षी खेलो इंडिया स्पर्धादरम्यान काही खेळाडूंना प्रमाणित चाचणी पुरावा असूनही अडचणीचा सामना करावा लागला आणि राष्ट्रीय स्पर्धेत खेळण्यापासून मुकावे लागले. अशा वेळेस शासकीय दवाखान्यातील पुरावा हा सबळ ठरू शकतो.
11) आजपर्यंतचा अनुभव असा आहे की, राष्ट्रीय स्पर्धेसाठी राज्याच्या संघामध्ये निवडल्या गेलेल्या खेळाडूंपैकी काही खेळाडू स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी सूचना देताना हजर नसतात, तेंव्हा संबंधित खेळाडू अनुपस्थित राहू नयेत याची काळजी संघ व्यवस्थापकांनी घ्यावी आणि या मिटिंगसाठी खेळाडू उपस्थित रहाण्याची ताकीद द्यावी.

केंद्र सरकार अँटी-डोपिंगबाबत कडक धोरण राबवत असल्याने डोपिंग टेस्ट गांभिर्याने केल्या जातात. काही दिवसांपूर्वी डोपिंग चाचणी करून खेळलेल्या तीन खेळाडूंना शोधून त्यांच्यावर खेळण्यास बंदी आणल्याचेही सर्व राज्य संघटनांना फेडरेशनने कळवले आहे. त्यामुळे आपण आपल्या जिल्ह्याच्या संघामधील प्रत्येक खेळाडूकडे जातीने लक्ष देवून खेळाडू अशा गैर गोष्टी करत नाहीत याची खातरजमा करावी. याची सुरुवात राज्य स्पर्धेपासून करण्याचाही शासनाचा मानस आहे याची जाणीव खेळाडूंना करून द्यावी जेणेकरून मेडलच्या छोट्या मोहापायी खेळाडूने आपले संपूर्ण करियर वाया घालवण्यापासून आपण सर्वांनी परावृत्त करावे.

12) राज्य संघामध्ये निवड झालेल्या खेळाडूला राष्ट्रीय स्पर्धा सहभाग बंधनकारक आहे. संयुक्तिक कारणाशिवाय अथवा योग्य वेळी पूर्वकल्पना न देता राष्ट्रीय स्पर्धेस अनुपस्थित राहून पर्यायाने राज्याच्या खेळाडूंवर अन्याय करणाऱ्या खेळाडूवर निलंबनाची आणि आर्थिक दंडात्मक कारवाई करण्याचा ठराव राज्य संघटनेनी पारित केला आहे.

महाराष्ट्र ज्युदो संघटना कोणत्याही परिस्थितीत, कोणाचेही गैरवर्तन कदापिही सहन करणार नाही. स्पर्धा आणि निवास या ठिकाणी असभ्यपणा, मोठयाने आवाज करणे, मोबाईलवर इतरांना त्रास होईल असा त्याचा वापर करणे इत्यादी गैरवर्तन कोणीही करू नये. निवास, भोजन आणि खेळण्याचा परिसर येथे गैरवर्तन केल्याची माहिती कळवण्याची जबाबदारी सामायिक राहील. याचबरोबर मालमत्तेचे नुकसान कोणीही आणि कोणत्याही कारणाने केल्यास त्या संबंधित संघाकडून तो खर्च वसूल तर केलाच जाईल शिवाय संबंधितांवर कडक कारवाई केली जाईल. महाराष्ट्राच्या संघातील त्या जिल्ह्याचे स्थान जाणे अथवा <u>जिल्ह्याचे निलंबनदेखील</u> होवू शकते याची गंभीर नोंद घेऊन, आपल्या शिस्तप्रिय खेळाची परंपरा जबाबदारीने सर्वांनीच पुढे न्यावी ही सर्वांनाच आग्रहाची विनंती. यासाठी संघव्यवस्थापक आणि संघाबरोबरील प्रशिक्षकांना प्रत्येक जिल्ह्याच्या सचिव/अध्यक्षांनी जागरूक रहाण्याच्या सूचना द्याव्यात.

- मॅटवर येवून न खेळता वॉकओव्हर देणाऱ्या खेळाडूस / संघास दरवेळी रु 100/- दंड केला जाईल.

13) संघातील खेळाडूंच्या विम्याची जबाबदारी संबंधित जिल्ह्याची असेल. खेळाडूंना स्पर्धेच्या कालावधीमध्ये अथवा स्पर्धेकरिता येताना अथवा स्पर्धेहून आपल्या गावी परतताना कोणत्याही घटनेमुळे होणाऱ्या इजांची / दुर्घटनांची जबाबदारी संयोजक संघटना अथवा महाराष्ट्र ज्युदो संघटनेवर किंवा त्यांच्या पदाधिकाऱ्यांवर रहाणार नाही. मात्र स्पर्धेदरम्यान प्राथमिक उपचाराची सोय आयोजकांकडून स्पर्धा ठिकाणी करण्यात येईल. पुढील गंभीर उपचाराचा खर्च आणि सोय ज्या-त्या संघास करावी लागेल याची नोंद घ्यावी.

14) सभासद नसणाऱ्या जिल्हा संघटनेस स्पर्धेमधे सहभाग देण्या - न देण्याचा अधिकार महाराष्ट्र ज्युदो संघटनेकडे सुरक्षित असेल.

15) प्रत्येक जिल्ह्यातील खेळाडू हा त्या जिल्ह्यातील रहिवासी असायला हवा. अर्थात कोणताही खेळाडू स्वत:चा जिल्हा सोडून इतर जिल्ह्यातून खेळताना आढळल्यास त्यावर कारवाई होईल तसेच त्यास मदत करणाऱ्या संबंधित क्लब / जिल्हयावरही कारवाई होईल.

16) व्यवस्थापक / प्रशिक्षक संघासोबत नसलेल्या संघास रहाण्याची जागा उपलब्ध होणार नाही.

17) आयजेएफच्या /जेएफआयच्या नव्या नियमांनुसार खेळाडूस प्रोत्साहन देताना (चियरिंग करताना) अथवा कोणत्याही प्रसंगी रेफरीच्या निर्णयावर आक्षेपार्ह प्रतिक्रिया देणे, रेफरीचे लक्ष विचलित करणे आदी घडल्यास कारवाई करण्यात येवू शकते. यासाठी स्पर्धा दरम्यान प्रशिक्षकासाठी असलेल्या आसनव्यवस्था केली असते त्या खुर्चीवर जिल्ह्याच्या प्रवेशिकेवर नाव असलेल्या प्रशिक्षकानेच बसायचे आहे. इतर कोणासही या ठिकाणी बसण्याची परवानगी नाही.

18) रेफरींचा निर्णय अंतिम असेल. रेफरीच्या निर्णयाबाबत आक्षेप असल्यास <u>फक्त संघाच्या व्यवस्थापकांनी</u> या संदर्भात मॅट चेअरमन / स्पर्धा संचालक यांच्याशी संपर्क साधावा.

19) राष्ट्रीय स्पर्धांसाठी जेएफआयच्या नियमाप्रमाणे असलेली ज्युदोगी ग्राह्य धरण्यात येतात यासाठी याची व्यवस्था राज्याच्या निवडल्या गेलेल्या संघातील खेळाडूंना करावी लागेल. मात्र राज्य स्पर्धेसाठी विशिष्ट कंपनीची ज्युदोगी हा निकष आवश्यक नसून फक्त फेडरेशनच्या नियमाप्रमाणे ज्युदोगीचा आकार आणि स्वच्छतेच्या बाबतीत निकष कायम असेल. महाराष्ट्र ज्युदो संघटनेचा आग्रह आहे की खेळाडूंनी IJF / JFI यांच्या मान्यताप्राप्त ज्युदोगी नेहमीच वापराव्यात.

20) राष्ट्रीय स्पर्धेसाठी सहभागी होण्याकरिता राज्याचा संघ या स्पर्धेतून निवडला जाईल. यासाठी सुवर्णपदक विजेता खेळाडू राज्याचे प्रातिनिधीत्व करेल. ज्या वजनगटामध्ये मुंबईचा खेळाडू प्रथम आला असेल तेथे लगेचच उर्वरित पदकविजेत्यांमधून स्पर्धा घेऊन / परिस्थितीनुरूप निर्णय घेऊन निवड केली जाईल. महाराष्ट्राच्या संघामध्ये निवड झालेल्या खेळाडूना राष्ट्रीय स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क, नोंदणी आदीसाठी अंदाजे रु 1, 200/- (रुपये एक हजार दोनशे फक्त) लगेचच राज्य संघटनेकडे भरावे लागतील याची नोंद घ्यावी.

21) राष्ट्रीय स्पर्धेसाठी लागणाऱ्या संघाच्या सवलतीच्या प्रवास खर्चाची जबाबदारी राज्य संघटना उचलेल. जर कन्फर्म तिकीटासाठी तात्काळ व्यवस्थेमधून पूर्ण रकमेचे बुकिंग करावी लागल्यास त्यासाठीचा लागणारा अतिरिक्त खर्च खेळाडूंना द्यावा लागेल, कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे जर कन्सेशन मिळाले नसल्यास पूर्ण तिकिटातील अर्ध्या तिकिटाचा खर्च खेळाडूला द्यावा लागेल.

22) सर्व पत्रव्यवहार संघटनेच्या लेटरहेडवर प्राधिकृत व्यवस्थापक अथवा सचिव यांच्या स्वाक्षरीने व्हावा.

- ✓ आयजेएफच्या/जेएफआयच्या नव्या नियमांनुसार खेळाडूस प्रोत्साहन देताना (चियरिंग करताना) अथवा कोणत्याही प्रसंगी रेफरीच्या निर्णयावर आक्षेपार्ह प्रतिक्रिया देणे, रेफरीचे लक्ष विचलित करणे आदी घडल्यास कारवाई करण्यात येवू शकते.
- ✓ रेफरींचा निर्णय अंतिम असेल. रेफरीच्या निर्णयाबाबत आक्षेप असल्यास फक्त संघाच्या व्यवस्थापकांनी या संदर्भात मॅट चेअरमन / स्पर्धा संचालक यांच्याशी संपर्क साधावा.
- ✓ आक्षेपार्ह सामन्याचे रेकॉर्डिंग पहाताना राज्य संघटनेच्या अधिकृत कॅमेरामधीलच रेकॉर्डिंग पाहिले जाईल, वैयक्तिक मोबाइलचे रेकॉर्डिंग गृहीत धरले जाणार नाही.

महाराष्ट्र ज्युदो संघटनेच्या सर्व उपक्रम/कार्यक्रमाबाबत माहिती सर्वांना कायम उपलब्ध व्हावी यासाठी इंटरनेटवर www.mahajudo.com हे संकेतकेंद्र उपलब्ध असून इच्छुकांनी कृपया यावरून माहिती घ्यावी. अधिक माहितीसाठी श्री. दत्ता आफळे, जनरल सेक्रेटरी, महाराष्ट्र ज्युदो संघटना 9049998765/94231 50231 (gs.mahajudo@gmail.com;) अथवा श्री संतोष मराठे, सचिव, नंदुरबार डिस्ट्रिक्ट ज्युदो असोसिएशन, 77985-51112; 98909-62953; (santoshmarathe786@gmail.com); यांच्याशी संपर्क साधावा.

कळावे,

आपला विश्वासू,

दत्ता आफळे
जनरल सेक्रेटरी
महाराष्ट्र ज्युदो संघटना

प्रति,
सचिव
जिल्हा ज्युदो संघटना

विषय: ज्युदो स्पर्धेच्या सहभागासाठी खेळाडूच्या पालकांचे परवानगी पत्र

महोदय / महोदया,

मी या पत्राद्वारे माझा पाल्य (पूर्ण नाव) कुमार / कुमारी                                        इयत्ता
यास महाराष्ट्र ज्युदो संघटनेद्वारे दिनांक  /  /  रोजी आयोजित राज्य स्पर्धेच्या पूर्व तयारीचा भाग असलेल्या जिल्हा निवड चाचणी स्पर्धेमध्ये तसेच राज्य स्पर्धेमध्ये ज्युदो खेळाडू म्हणून सहभागी होण्यासाठी मी माझी परवानगी देत आहे. मला ज्युदो खेळातील तसेच खेळण्यासाठी करण्यात येणाऱ्या प्रवासादरम्यानच्या जोखीमींची पूर्वकल्पना जिल्हा संघटेनेद्वारे दिलेली आहे.

मला हेही माहिती आहे की, माझ्या पाल्याचे प्रशिक्षक, संघाचे व्यवस्थापक आणि जिल्हा अथवा राज्य संघटनेचे पदाधिकारी माझ्या पाल्याच्या सुरक्षेसाठी आवश्यक आणि योग्य ती सर्व काळजी घेत आहेत.

योग्य ती सर्व काळजी घेऊनही, जर कदाचित कोणतीही अप्रिय घटना घडल्यास मी माझ्या पाल्याचे प्रशिक्षक, संघाचे व्यवस्थापक आणि जिल्हा अथवा राज्य ज्युदो संघटनेचे पदाधिकारी यांना जबाबदार धरणार नाही.

मी या पत्राद्वारे अशीही हमी देतो की, माझा पाल्य सुरक्षिततेचे सर्व नियम काटेकोरपणे पाळेल आणि त्यांनी ते आयुष्यात नेहमीच पाळावेत यासाठी मी त्याला मार्गदर्शनही केलेले आहे.

कृपया माझ्या पाल्याबाबतीत खालील वैद्यकीय नोंद ठेवावी;        (लागू नसल्यास लागू नाही असे लिहावे)

1. ॲलर्जी: ______________________
2. नेहमीची औषधे घेत असल्यास: ______________________
3. काही आजार / जखम ______________________
4. टिटॅनियसचे इंजेक्शन कधी घेतले आहे. ______________________
5. रक्त गट ______________________

पालकांची स्वाक्षरी: ________________________________

पालकांचे नाव :- ________________________________________

तारीख:  /  /20  ; स्थळ: ______________

## 47 व्या राज्यस्तरीय ज्युनियर्स ज्युदो स्पर्धा आणि राष्ट्रीय निवड चाचणी स्पर्धा-2019, नंदुरबार
## दिनांक : 09, 10 आणि 11 नोव्हेंबर 2019

जिल्हा ज्युदो संघटनेचे नाव: ____________________________________________

दहावीच्या विद्यार्थी खेळाडूंची यादी

| क्र. | खेळाडूचे पूर्ण नाव | जन्मतारीख | वयोगट | वजनगट | शाळेचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

बारावीच्या विद्यार्थी खेळाडूंची यादी

| क्र. | खेळाडूचे पूर्ण नाव | जन्मतारीख | वयोगट | वजनगट | शाळेचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

सचिवांचे नाव, स्वाक्षरी आणि शिक्का: